
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय पंधरावा , भाग दुसरा

## सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

ई साहित्य प्रतिष्ठान®

# भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

## अध्याय पंधरावा : भाग दुसरा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

## श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

## ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

**E** Sahity Pratishthan

**E**leventh floor(G1102)

**E**ternity

**E**astern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

जसे त्या प्रलय कालात। नदी-नालेच नसती उरत। तैसे मम अद्वैतात। द्वैत नाही ॥३३७॥
पाण्याच्या त्या कारण। सूर्याच्या प्रतिबिंबाचे प्रकटन। सूर्य का कधी दोन। असती अर्जुना ॥३३८॥
आकाश चौकोनी की वाटोळे। ते आकारी असूनही वेगळे। पण घटमठी वेटोळे। भासते जैसे ॥३३९॥
जसे त्या स्वप्नात। मनुष्यच राजा असे होत। आणि स्वप्नातल्या सर्व वस्तूत। असे तोच ॥३४०॥
जसे इतर धातू मिसळता। लोपते सोन्याची शुद्धता। तैसे माया ती प्रकटता। निपजे अज्ञान ॥३४१॥
त्या अज्ञाना कारण। घडे स्वरूपाचे विस्मरण। मग देहासी मी मानणं। घडे तेथे ॥३४२॥
ऐसे देह मी मानून। स्वरूप विस्मरणाकारण। ते स्वत:चे वेगळपण। भासते मग ॥३४३॥
जसे वाऱ्याच्या त्या कारण। होतसे तरंगांचं प्रकटन। मग तरंगाने स्वत:स अंश मानणं। तैसे अर्जुना ॥३४४॥
ऐसा जडासी जीवविता। देह अहंता उपजविता। जिवाचा भास पांडुसुता। अवतीर्ण होतो ॥३४५॥
मी-पणाच्या कारण। द्वैताचे होते प्रकटन। मी जीव वाटणं। द्वैत अर्जुना ॥३४६॥
जन्मणे आणि मरणे। सत्य जया भासणे। तया जीव मी म्हणे। अर्जुना माझ्या ॥३४७॥
अर्जुना या जीवात। मी ऐसा असे राहत। चंद्र जसा प्रतिबिंबात। राहतो अर्जुना ॥३४८॥
त्या स्फटिक मण्यास। कुंकवावर ठेवल्यास। जसा लाल मण्याचा भास। तैसे अर्जुना ॥३४९॥
तैसे न मोडता अनादिपण। भासते जे माझे कर्तेपण। तेच अर्जुना अज्ञान। भ्रांती कारणे ॥३५०॥
आत्मतत्त्व जे चोखट। होता प्रकृतीसी एकवट। मग मी-पणाची वटवट। प्रकटे तेथे ॥३५१॥
मनादि साही इंद्रियं। जे प्रकृतीचेच कार्य। तया माझे म्हणून होय। व्यापारारूढ ॥३५२॥
जसे एखाद्या संन्याशाने। स्वप्नी आपलेच कुटुंब होणे। आणि सैरावैरा धावणे। स्वप्नातच ॥३५३॥
तैसे विस्मृतीकारण। स्वत:स देह मानून। देहाचेच भजन। करतसे जीव ॥३५४॥
मनाच्या त्या कारण। इंद्रियाभास सत्य वाटून। इंद्रियात होतो रममाण। जीव अर्जुना ॥३५५॥
त्वचेच्या त्या कारण। स्पर्शाचा भास होणं। मग द्वैत खरं वाटणं। घडे तेथे ॥३५६॥
डोळ्यांच्या त्या कारण। घडे दृश्यांचं भासणं। मग द्रष्ट्याचा भास होऊन। भोगी दृश्य ॥३५७॥
त्या जिभेच्याकारण। रसस्वाद घेऊन। जिवाचे मी-पण। दृढ करी ॥३५८॥
नाकाच्या त्या कारण। गंधज्ञान होणं। जे मी-पणाच्या भावानं। भोगीतसे तो ॥३५९॥
ऐसे मनइंद्रिया कारण। मी-पणाचा भास होणं। म्हणून मनइंद्रियात अडकणं। घडे तेथे ॥३६०॥
जेव्हा एखाद्या शरीरात। जीव असे राहत। मग स्वत:ला कर्ता मानत। भोगतसे भोग ॥३६१॥
जेव्हा एखाद्या महालात। जर मनुष्य असे राहत। तेव्हाच तो श्रीमंत। गणला जाई ॥३६२॥
तैसे देहासी तादात्म्य पावून। त्या मनइंद्रियांच्या कारण। जिवाचे ते मी-पण। दृढ होई ॥३६३॥
शरीरा येता मरण। मनइंद्रिय सोबत घेऊन। जातसे शरीर सोडून। जीव तेव्हा ॥३६४॥
जैसे अपमानिला अतिथी। नेई यजमान पुण्यसंपत्ती। वा थांबे कळसूत्री बाहुल्यांची गती। तुटता दोरा ॥३६५॥
जसे सूर्य जाता मावळून। प्रकाश नेई सोबतीनं। वा वारा जातसे घेऊन। सुगंध सवे ॥३६६॥
तैसे देह तो सोडताना। सोबत नेई इंद्रिय आणि मना। घालण्या तो धिंगाणा। पुढच्या जन्मी ॥३६७॥
मग मृत्यू वा स्वर्ग लोकात। तो देह असे धरत। आणि मग त्या देहात। रमे पुन्हा ॥३६८॥
दीप जेधवा मावळतो। मग प्रकाश लया जातो। आणि जेव्हा दीप उजळतो। प्रकटतसे प्रकाश ॥३६९॥
अज्ञानाच्या कारण। हे येणं जाणं पाहून। खरे वाटते जन्ममरण। अज्ञ जना ॥३७०॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आत्मा देहात आला । तयाने विषय भोगिला । वा देह सोडून गेला । मानती खरे ॥३७१॥
एऱ्हवी येणे आणि जाणे । करणे अथवा भोगणे । ते प्रकृतीच्याच संबंधाने । घडे सारे ॥३७२॥
गर्भात त्या शिरून । तयाने नवा जन्म घेणं । घडता ते चलनवलन । म्हणती जन्मला ॥३७३॥
इंद्रियांच्या त्या संगतीने । मनाने विषयासी वर्तणे । तयासीच बा भोगणे । म्हणती अर्जुना ॥३७४॥
मग भोगांनी क्षीण होऊन । तो जातसे मरून । मग कपाळ ते पिटून । रडती सारे ॥३७५॥
वृक्ष जर हालला । तरच वारा मानला । अर्जुना का या नियमाला । मानावे खरे ॥३७६॥
अथवा आरसा पुढे धरणे । तरच मी आहे म्हणे । आरशाच्याच का कारणे । मानावे स्वत:ला ॥३७७॥
आरसा दूर करणे । प्रतिबिंब नाहीसे होणे । मग मी नाही म्हणणे । खुळचटपणा ॥३७८॥
शब्द गुण आकाशाचा । म्हणणे गडगडाट ढगांचा । ढगाकारणे आरोप धावण्याचा । जसा चंद्रा ॥३७९॥
तैसे देहाचे होणे जाणे । अज्ञानाच्याच कारणे । आत्मतत्त्वा दोष देणे । भ्रम अर्जुना ॥३८०॥
आत्मा ब्रह्म होऊन जाणणे । देहधर्म प्रकृतीठायी पाहणे । ऐसे स्पष्ट जो जाणे । तोच ज्ञानी ॥३८१॥
होता ते आत्मज्ञान । जाते मनासी तादात्म्य तुटून । मग शरीर मनात गुरफटणं । होत नाही ॥३८२॥
ऐसे आत्मज्ञानाच्या कारण । मनासी तादात्म्य तुटणं । तयासी अर्जुना आत्मज्ञान । समजावे झाले ॥३८३॥
जसे त्या नक्षत्रसमूहाने । सागरी प्रतिबिंबित होणे । प्रतिबिंबा प्रतिबिंब जाणणे । ज्ञान अर्जुना ॥३८४॥
गगन गगनीच आहे । तैसा आत्मा देखती देहे । ऐसे जीवा जो पाहे । तो ज्ञानी अर्जुना ॥३८५॥
खळाळत्या प्रवाहात । चंद्र प्रतिबिंब असे डोलत । पण स्थिर असे नभात । चंद्र जेवि ॥३८६॥
डबके भरते आणि आटते । प्रतिबिंब दिसते आणि लोपते । परि सूर्य त्या आकाशाते । स्थिरच की ॥३८७॥
घट मठ घडले । आणि पुन्हा तया मोडले । परि आकाश ते संचले । आहेच की ॥३८८॥
तैसी आत्मसत्ता चिरंतन । परि देहाचं जन्मणं आणि मरणं । ते अज्ञानाच्या कारण । जाणती ज्ञानी ॥३८९॥
आत्मतत्त्व चढे ना वोहटे । चेष्टवी ना चेष्टे । ऐसे आत्मज्ञाने चोखटे । जाणती ते ॥३९०॥
आत्मज्ञान ते होता । आकळते परमाणुची सत्ता । सर्वोच्च शास्त्राची पारंगतता । प्रकटते मनी ॥३९१॥
परि मनी वैराग्य नसता । नच प्रकटते ब्रह्ममयता । मग मजसी एकरूपता । घडे कैसी ॥३९२॥
ज्ञानाच्या गोष्टी तोंडभर । अंतरी विषयांचा वावर । ऐशा बोलघेवड्यावर । कृपा नाही ॥३९३॥
ब्रह्म अंतरी न प्रकटता । सुटेच ना जन्ममरणाचा गुंता । वरवर पोथी वाचता । न होते ज्ञान ॥३९४॥
डोळे ते लावणे । नाकाने हिऱ्याचा वास घेणे । मग हिऱ्याची किंमत कळणे । शक्य नाही ॥३९५॥
तैसे असता अहंकार । जरी पाठ शास्त्रे भाराभर । तरी माझी प्राप्ती न होणार । जन्म कोटी ॥३९६॥
मीच ब्रह्म होऊन । राहतो विश्वात व्यापून । तयाचे ते वर्णन । ऐक आता ॥३९७॥
सूर्यासकट आघवी । विश्वरचना ही लाघवी । ती माझीच बा जाणावी । प्रकृती अर्जुना ॥३९८॥
जलाशये सुकून जाता । जो जगा देतो ओल पुरता । तो चंद्र पांडुसुता । तेज माझे ॥३९९॥
अन्न शिजणं आणि पचन । ते तेजाच्याच कारण । अखिल विश्वाचे प्रकटन । माझेच ठायी ॥४००॥
मी राहतो भूमीत । म्हणून नाही विरघळत । ती पृथ्वी बा समुद्रात । अर्जुना कधी ॥४०१॥
पृथ्वीचा घेऊन आकार । मीच साही भुतांचा भार । आणि बनून चराचर । राहतो जगी ॥४०२॥
आकाशी चंद्राच्या रुपानं । मीच बरसतो अमृत होऊन । वनस्पतीचे ते पोषण । माझेच कारणे ॥४०३॥
माझे ते किरण । पृथ्वीवर उतरून । करती औषधीचे निर्माण । आरोग्यदायी ॥४०४॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अन्नधान्य ते पिकवून। मीच चालवी भुतांचे जीवन। सर्वांचे पोट भरणं। कर्तव्य माझे ॥४०५॥
अन्न करून निर्माण। मीच टाकी पचवून। सर्वांना मिळे समाधान। माझे कारणे ॥४०६॥
प्राणिमात्रांच्या शरीरात। मीच उष्णता असे खेळवत। आणि जठराग्नी बनून जठरात। राहतो मी ॥४०७॥
प्राण आणि अपान। रात्रंदिवस ते फुंकून। अन्न ते पचवणं। काम माझे ॥४०८॥
कोरडे आणि शिजलेले। मऊ आणि करपलेले। मीच बा ते पचवले। अन्न अर्जुना ॥४०९॥
ऐसे जीव ते प्रकटवून। मीच होतो जीवन। जीवनी मुख्य साधन। मीच अर्जुना ॥४१०॥
आता ऐसियावरी काई। सांगू कशी नवलाई। येथे मजवाचून नाही। काहीच अर्जुना ॥४११॥
आता कशाच्या त्या कारण। काही ते सुखी असणं। नि काही दु:खी का असणं। शंका तुझी ॥४१२॥
जर सर्व त्या नगरात। एकच प्रकाश असे वसत। मग काही जण काळोखात। राहती का ॥४१३॥
अशा त्या शंकेनं। भरले आहे तुझे मन। म्हणून आता समाधान। करतसे मी ॥४१४॥
येथे केवळ मीच असणं। माझ्यावीण असे कोण। पण अज्ञानाच्या कारण। भासते दु:ख ॥४१५॥
ध्वनी आकाशाचा गुण। पण वेगवेगळ्या वाद्यातून। निरनिराळे आवाज निघणं। तैसे अर्जुना ॥४१६॥
जरी सूर्य बा अलिप्त। तरी त्याच्या त्या प्रकाशात। निरनिराळे व्यवहार चालतात। तैसे अर्जुना ॥४१७॥
जरी एकचि मिळे पाणी। पण बीज धर्मानुसार उगवणी। तैसे जिवाच्या कर्मांनी। भासते दु:ख ॥४१८॥
एक ज्ञानी एक अज्ञानी। एक वर्ते सुखानी। दुजा भरला त्या दु:खांनी। कर्माच्या कारण ॥४१९॥
जसे स्वातीचे उदक। शुक्तीत मोती नि सापात विख। तैसे भासते सुखदु:ख। ज्ञान अज्ञानकारणे ॥४२०॥
माझ्याच त्या कारण। मीपणाचं ते भासणं। अहंपणाचे जेथून स्फुरण। ते मीच अर्जुना ॥४२१॥
सत्संग करणे। योग तो अभ्यासणे। गुरुसेवा करणे। वैराग्यास्तव ॥४२२॥
ऐसे सत्कर्मे आचरता। संपते ती अज्ञानता। मजसी एकरूप होता। होते ज्ञान ॥४२३॥
प्राप्त होता आत्मज्ञाना। संपती साऱ्या विवंचना। संपवून त्या अज्ञाना। व्हावे मुक्त ॥४२४॥
सूर्यप्रकाशाचे कारण। घडे सूर्यासी पाहणं। तसे विरता मन। बोध माझा ॥४२५॥
शरीरी तादात्म्य ठेवणे। संसारात त्या अडकणे। देह अहंता वाढवणे। दु:ख अर्जुना ॥४२६॥
जे स्वर्ग संसारालागी। धावती कर्ममार्गी। ते दु:खी अभागी। जाण अर्जुना ॥४२७॥
पण कारण त्यांच्या अज्ञाना। मूळ मीच आहे अर्जुना। येथे का माझ्यावीणा। आहे काही ॥४२८॥
प्रकाशा कारण अभ्र दिसणं। तसं माझ्याकारण दु:ख होणं। संसाराचे प्रकटन। माझेच ठायी ॥४२९॥
झोपणे वा जागणे। ते जागृतीचेच कारणे। तसा ज्ञाने अज्ञाने। मीच मूळ ॥४३०॥
दोरच सर्पाभासाचे अधिष्ठान। तसे ज्ञान अज्ञान मजकारण। विश्वाचं ते भासणं। माझेच ठायी ॥४३१॥
न समजता अहंकाराची व्यर्थता। मजसी जाणू जाता। वेदाने प्रयत्न करता। फुटल्या शाखा ॥४३२॥
अर्जुना त्या त्रिगुणात। मीच असे बा वसत। माझ्यावीण काहीच नसतं। या जगती ॥४३३॥
त्या महासिद्धांतापाशी। श्रुति हारपती शब्दांसी। जैसा सुगंध आकाशी। विरतो अर्जुना ॥४३४॥
तैसे समस्तही श्रुतिजात। जेधवा होई निवांत। मगच मी यथावत। प्रकटतो अर्जुना ॥४३५॥
पाठी श्रुतीसहित अशेष। जग हारपे जेथ नि:शेष। ते निजज्ञानही चोख। जाणतो मीचि ॥४३६॥
जैसे झोपेतून जागता। संपते स्वप्नांची सत्ता। मग आपलाच राबता। आपले ठायी ॥४३७॥
तैसे आपले अद्वैतपण। मी जाणतसे दुजेवीण। आहे माझीच मला जाण। स्वसंवेद्य मी ॥४३८॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जैसे कापुरा आग लागणे । मग काहीच न उरणे । तैसे चारही वाचा संपणे । ज्ञान अर्जुना ॥४३९॥
अविद्येस भस्म करून । स्वत: लोपते ज्ञान । मग असणं वा नसणं । अर्थ नाही ॥४४०॥
होता ते आत्मज्ञान । अहंकार जाई विरून । मग केवळ ते ब्रह्मपण । उरे तेथे ॥४४१॥
ऐसे सर्व ते चराचर । माझेच ठायी उजागर । तेथे आपला आणि पर । भाव नाही ॥४४२॥
अलिप्तपणे मी ऐसा तो । अर्जुना विश्वात बा राहतो । जसा नभीचा चंद्र तो । राहे प्रतिबिंबी ॥४४३॥
जैसे त्या आरशात । चित्र असे उमटत । तैसे सर्व विश्व माझ्यात । प्रकटते अर्जुना ॥४४४॥
आहे ब्रह्म वस्तूचा स्वभाव तो । जो अधिकाधिकच विस्तारतो । म्हणून अर्जुन विचारतो । देवास आता ॥४४५॥
देवा करताना ब्रह्माचे विवेचन । तू सांगितले ते उपाधिरहितपण । तयाचे ते निरूपण । करावे आता ॥४४६॥
ऐकून ऐसा तो प्रश्न । बोलला देव संतोषून । म्हणे अर्जुना तुझं विचारणं । आवडलं मला ॥४४७॥
अर्जुना बा आम्हास । आहे बोलण्याची हौस । तुज जैसा प्रश्नकर्ता खास । भेटत नाही ॥४४८॥
आज तुझ्या रूपानं । झालं मनोरथ माझं पूर्ण । न संकोचता प्रश्न । विचारलास तू ॥४४९॥
केवळ ज्ञान ते होता । जे येते अनुभवता । त्या तत्त्वाचा प्रश्न आता । केलास तू ॥४५०॥
जसा आरसा समोर धरता । येते डोळ्याने डोळ्यास पाहता । तैसा बा प्रश्नकर्ता । भेटलास तू ॥४५१॥
तू अज्ञानपणे विचारावे । नि आम्ही ज्ञानपणे सांगावे । तशातला हा नव्हे । संबंध अर्जुना ॥४५२॥
ऐसे बोलून अलिंगिले । कृपादृष्टी अवलोकिले । पुढे देव काय बोलले । ऐका आता ॥४५३॥
दोन ओठ एक बोलणं । दोन पाय एक चालणं । तसं विचारणं आणि सांगणं । आहे अर्जुना ॥४५४॥
अर्जुना याच अर्थानं । हे विचारणं आणि सांगणं । एकचि बा अभिन्न । येथे आहे ॥४५५॥
ऐसे देवाने बोलून । दिले अर्जुनास आलिंगन । पण मनात म्हणाला भिऊन । हे नोहे बरे ॥४५६॥
टिकवण्या ढेप गुळाची । आवश्यकता असते क्षाराची । टिकण्या गोडी संवादाची । दुरीच बरी ॥४५७॥
तसे माझ्यात आणि याच्यात । काहीच फरक नाही असत । पण प्रेमाचा हा वात । ओसरो आता ॥४५८॥
असा विचार तो करून । विचारता झाला भगवान । अर्जुना काय तो प्रश्न । केलास तू ॥४५९॥
अर्जुन त्या ब्रह्ममयतेत । होता लीन होण्याच्या बेतात । पण पुन्हा भानावर येत । बोलला तो ॥४६०॥
मग बा गहिवरून । बोलला तो अर्जुन । म्हणे उपाधिरहिताचं वर्णन । करावे देवा ॥४६१॥
बोल ते ऐकून । उपाधि त्या दोन । सांगू लागला भगवान । मग तेथे ॥४६२॥
विचारणा होती उपाधिरहिताची । पण आरंभली चर्चा उपाधीची । पंचाईत त्या अर्जुनाची । झाली तेथे ॥४६३॥
जो बा खिडकी उघडतो । तयासच प्रकाश लाभतो । तैसे जो उपाधि जाणतो । तयासीच ज्ञान ॥४६४॥
शेवाळ दूर करता । होते पाण्याची प्राप्तता । तैसी उपाधि ती त्यागता । ज्ञान होई ॥४६५॥
अभ्र जाता निघून । मग सिद्धच की गगन । तैसे उपाधीचं विरणं । अनिवार्य येथे ॥४६६॥
होता उपाधीचा शेवट । प्रकटते निरूपाधिक चोखट । हीच आहे वाट । ज्ञानाची अर्जुना ॥४६७॥
जसे त्या कासवीनं । केवळ नजरेनं पिल्लू पोसणं । तैसे उपाधीचे वर्णन । गुणकारी ॥४६८॥
जे नाही सांगता येत । ते सांगण्याची हीच असे रीत । म्हणून उपाधीची बात । आरंभिली देवे ॥४६९॥
नभीचा चंद्र दाखवणे । आपुल्या त्या बोटाने । तैसेच हे बा सांगणे । उपाधीचे अर्जुना ॥४७०॥
मग म्हणाला भगवंत । अर्जुना या विश्वात । केवळ द्वैतच असे नांदत । येथे अर्जुना ॥४७१॥
जैसे त्या गगनी । दिवस रात्रीची नांदणी । तैसे या संसारभवनी । नांदते द्वैत ॥४७२॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

सरता हे द्वैत। मगच प्रकटते अद्वैत। अंतरी असता द्वैत। अद्वैत कैचे ॥४७३॥
पण कशाला अद्वैताची बात। आपण जाणूया हे द्वैत। जे जाणता विश्व असे विरत। अद्वैतामाजी ॥४७४॥
काय असे ते द्वैत। दोघांची जी बात। कैसे ते नांदतात। ऐक आता ॥४७५॥
एक असे व्यक्त। दुसऱ्या म्हणती अव्यक्त। दोघाकारणेच असे चालत। विश्व अर्जुना ॥४७६॥
एका नाम क्षर। दुसऱ्या म्हणती अक्षर। दोघाकारणेच संसार। चालतो अर्जुना ॥४७७॥
आता क्षर तो कवण। अक्षराचे काय लक्षण। याचे ते विवेचन। ऐक आता ॥४७८॥
अर्जुना हे दृश्याचं प्रकटन। चराचर जे मोठे लहान। जे दिसे मनइंद्रियाकारण। ते क्षराक्षर अर्जुना ॥४७९॥
व्यक्त चराचर ते क्षर। अव्यक्त मन ते अक्षर। असती पंचभुतांचा व्यवहार। अर्जुना दोन्ही ॥४८०॥
गुण आकाराचे नाणे। प्रकटते जयाचे कारणे। काळाच्या हातातील खेळणे। हे अर्जुना ॥४८१॥
जे नसते ते दिसते। जे असते ते लपते। प्रकटते नष्ट होते। प्रतिक्षण अर्जुना ॥४८२॥
अर्जुना विश्वाचे प्रकटन। ते भ्रांतीचेच बा रान। तेच जग म्हणून। प्रसिद्ध आहे ॥४८३॥
अष्टधा प्रकृतीकारण। छत्तीस तत्त्वाचं प्रकटन। तेच बा विश्व रूपानं। नांदते येथे ॥४८४॥
आताच मी सांगितले। अश्वत्था ते वर्णिले। तू सर्व बा ऐकले। आहेच अर्जुना ॥४८५॥
होऊन अर्जुना साकार। नांदतो येथे निराकार। निराकाराचेच नगर। विश्व आहे ॥४८६॥
प्रतिबिंब पाहून पाण्यात। सिंह उडी असे घालत। तैसे करून स्वत:चा घात। साकारते ब्रह्म ॥४८७॥
प्रतिबिंबाच्या त्या भासाने । द्वैताचे ते प्रकटणे। अज्ञानाच्याच कारणे। भासते द्वैत ॥४८८॥
मी-पणा तो कल्पून। ब्रह्म जाते झोपून। मग विश्वाचं प्रकटन। मीपणा कारणे ॥४८९॥
स्वप्नात शय्यागार पाहून। मग जावे तेथे झोपून। तैसे ब्रह्माठायी कल्पनेनं। प्रकटते विश्व ॥४९०॥
बेहोष होऊन मी-पणात। मी सुखीदु:खी मानत। असे मग बडबडत। स्वप्नी जैसा ॥४९१॥
हा जनक ही माता। हा पुत्र ही कांता। ऐसा मग तो पुरता। भ्रमून जाई ॥४९२॥
ऐसे अज्ञाना कारण। सत्य वाटून जन्ममरण। जो फिरे भव स्वर्गात अडकून। तो क्षर अर्जुना ॥४९३॥
जो क्षेत्रज्ञ म्हणून। प्रसिद्ध बा असणं। तोच जीव या नावानं। ओळखला जातो ॥४९४॥
जो स्वत:ला विसरून। वागे पंचभुतांच्या तंत्रानं। तयासच क्षर म्हणून। ओळखती सारे ॥४९५॥
तो ब्रह्म असल्याकारणे। सार्थ पुरुष या नावाने। तयाने देहपुरी राहणे। म्हणून पुरुष ॥४९६॥
अहंकाराच्या उपाधीनं। क्षरपणा प्रकटला म्हणून। क्षर या नावानं। प्रसिद्ध झाला ॥४९७॥
खळाळणाऱ्या पाण्यात। चंद्रबिंब असे डोलत। तैसा हा विकारात। अडकला भासे ॥४९८॥
खळाळणारे पाणी आटता। नुरे चंद्रबिंबाचा पत्ता। तसा उपाधीचा नाश होता। नुरती भ्रम ॥४९९॥
उपाधीच्याच कारण। प्रकटते तयाचे क्षणभंगुरपण। म्हणून तया क्षर म्हणणं। पडे अर्जुना ॥५००॥
प्रकट जे गुण आकार। तया नाव बा क्षर। आता सांगतो अक्षर। ऐक अर्जुना ॥५०१॥
तरी अक्षर जो दुसरा। पुरुष गा धनुर्धरा। तो मध्यभागी राहणारा। आहे अर्जुना ॥५०२॥
ज्ञान-अज्ञानाच्या मध्यात। अर्जुना असे तो राहत। दोन्हीकडे जाता येत। तयाला अर्जुना ॥५०३॥
समजेच्या कारण। तोच होतसे ज्ञान। अथवा बनून ते अज्ञान। फिरे भवचक्री ॥५०४॥
जसे घटाने ते फुटणे। नि मातीस्वरूप होणे। त्या मातीच्या प्रमाणे। स्वरूप त्याचे ॥५०५॥
शरीर गेले मरून। पण न प्रकटले आत्मज्ञान। म्हणून अव्यक्त रूपानं। अस्तित्व त्याचे ॥५०६॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जागेपण ते गेले । पण स्वप्न नाही प्रकटले । जे सुषुप्तीपणे राहिले । ते अक्षर गा ॥५०७॥
विश्व अवघे मावळे । आणि आत्मबोध न उजळे । त्या अज्ञानदशे केवळे । नाव अक्षर ॥५०८॥
संपून जाता सर्व कला । चंद्र भासे लोपला । घडे जैसे हे अमावास्येला । तैसे अर्जुना ॥५०९॥
शरीराचा होता नाश । अव्यक्त जे राहते शेष । जे जीवदशेचे बीज विशेष । अक्षर ते ॥५१०॥
जे असे शरीर त्यागत । नि पुन्हा असे जन्म घेत । ते अक्षर म्हणजेच अव्यक्त । आहे अर्जुना ॥५११॥
आहे ढगासारखी सुषुप्ति । तिलाच बीजभाव म्हणती । स्वप्न आणि जागृती । फळ तिचे ॥५१२॥
जयासी म्हणती बीजभाव । ते वेदांतातील आहे नाव । तोच आहे ठाव । अक्षराचा ॥५१३॥
ऐसे हे विपरीत ज्ञान । जेथून प्रकटते जागृती स्वप्न । संकल्प विकल्पाचे रान । अक्षर अर्जुना ॥५१४॥
आकार जेथून उठी । जी जीवभावाची पेटी । ज्ञान-अज्ञानाची मिठी । अक्षर अर्जुना ॥५१५॥
अक्षरच क्षर बनून । अनुभवी जागृती आणि स्वप्न । प्रकटते जागृती स्वप्न । अक्षराकारणे ॥५१६॥
अज्ञान बीज सुषुप्ति । ऐसी जयाची ख्याती । होते ब्रह्ममयतेची प्राप्ती । विरता अक्षर ॥५१७॥
समज ती येता । विरते अक्षराची अवस्था । मग बा ब्रह्ममयता । प्रकटते तेथे ॥५१८॥
प्रकृती पुरुष संयोगानं । प्रकटते बा अज्ञान । मग अक्षर क्षर बनून । चालते स्वप्न ॥५१९॥
या भवचक्रास कारण । तू अक्षरच जाण । याच अक्षराकारण । फोफावे अश्वत्थ ॥५२०॥
आत्मस्वरूप असून । हा अज्ञानात पहातो स्वप्न । अज्ञानाच्या कारण । निद्रेत हा ॥५२१॥
हा विकारांचा बाजार । विपरीत ज्ञानाचे सार । सुषुप्तीचा कहर । अक्षर अर्जुना ॥५२२॥
म्हणोनिया आपैसे । अर्जुना हा कधीच न नाशे । केवळ ज्ञान स्पर्शे । विरतसे हा ॥५२३॥
ऐसा हा अक्षर । वेदांती प्रसिद्ध फार । अहंभावाचे सार । बीजवृत्ती ॥५२४॥
भवचक्राचं ते चालणं । या अक्षराच्याच कारण । मूळ चैतन्याचे विस्मरण । अक्षराकारणे ॥५२५॥
जागृती आणि स्वप्न । त्या सुषुप्तीच्या कारण । सुषुप्तीचं विरणं । सूत्र आहे ॥५२६॥
लाकूड जळून नष्ट होते । तैशी जेधवा सुषुप्ति विरते । मगच बा प्रकटते । आत्मज्ञान ॥५२७॥
विरता सुषुप्ति अज्ञान । प्रकटते बा ज्ञान । आहे पाहणाऱ्यावीण । पाहणे जे ॥५२८॥
तोच गा उत्तम पुरुष । तृतीय जो निष्कर्ष । क्षर अक्षराहून सरस । पुरुष अर्जुना ॥५२९॥
सुषुप्ति आणि स्वप्न । जयाने बा जाणणं । ती जाणीवच जाण । पुरुष अर्जुना ॥५३०॥
जसं सूर्याचं ते असणं । वेगळं किरण मृगजळाहून । तसं हे पुरुषाचं असणं । आहे अर्जुना ॥५३१॥
जशी त्या काष्ठात । आग असे बा वसत । तैसाच पुरुष असे रहात । क्षराक्षरी ॥५३२॥
जैसे त्या प्रलयात । नदीनाले एक होतात । तसे क्षर अक्षर विरतात । पुरुषा माजी ॥५३३॥
अर्जुना जागृती ती जाऊन । स्वप्न सुषुप्तीही विरणं । मगच बा ज्ञान । प्रकटते अंतरी ॥५३४॥
मग एकपण ना दुजे । असणे नसणे हे नेणिजे । अनंत ऐसे ब्रह्म जे । ते अनुभवा येते ॥५३५॥
ऐसे अनंत जे काही । तोच उत्तम पुरुष पाही । तया परमात्मा हे नावही । आहे अर्जुना ॥५३६॥
ब्रह्मज्ञान न होता । पुरुष न समजतो पांडुसुता । बुडणाऱ्याची अवस्था । बुडणारा जाणे ॥५३७॥
विवेकाच्या कारण । जयासी होते आत्मज्ञान । तोच करू शके पुरुषाचे वर्णन । वेदाप्रमाणे ॥५३८॥
ऐसे क्षराक्षरा जाणून । दोहोंसी विरू देणं । तेच बा आत्मज्ञान । आहे अर्जुना ॥५३९॥
ऐसे पुरुष या शब्दानं । केलं जातं परमात्म्याचं वर्णन । पुरुष परमात्मा दोन । नसती अर्जुना ॥५४०॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

न बोलणेच जेथे बोलणे । जेथे काहीच न होणे जाणे । काहीच नसून असणे । सर्व काही ॥५४१॥
द्वैत जेथे विसावते । सांगणाऱ्यासंगे सांगणे जाते । द्रष्ट्यासह दृश्य विरते । दर्शनात अर्जुना ॥५४२॥
द्रष्टा-दृशाचं विरणं । तेव्हाच प्रकटते दर्शन । तयासीच बा ज्ञान । म्हणती अर्जुना ॥५४३॥
नाकात वा फुलात । सुगंध नाही दिसत । म्हणून का नाही असत । सुगंध तेथे ॥५४४॥
द्रष्टा-दृश्य जरी विरले । तेथे दर्शनच बा उरले । जयाने हे अनुभवले । तो ज्ञानी अर्जुना ॥५४५॥
तो सर्वांना जाणतो । सर्वांना स्वत:त विरघळवतो । स्वत:ठायी प्रकटवतो । विश्व अर्जुना ॥५४६॥
नादाने ऐकणे नाद । स्वादाने चाखणे स्वाद । आनंदाने भोगणे आनंद । तैसे अर्जुना ॥५४७॥
जो पूर्णतेचा आयाम । तोच बा पुरुषोत्तम । विश्रांतीचाही विश्राम । पुरुष अर्जुना ॥५४८॥
सुखाने सुख जोडावे । तेजास तेज सापडावे । शून्यानं महाशून्यात बुडावे । तैसे अर्जुना ॥५४९॥
जो सर्वत्र बा पसरतो । नि पुन्हा ग्रासून घेतो । बहुत होऊन होतो । शून्य पुन्हा ॥५५०॥
अज्ञानाच्या कारण । दिसे शुक्ती ठायी रुपेपण । स्वत: रुपे नसून । दावी रुपे ॥५५१॥
जसे न सोडता सोनेपण । सोन्यानेच दागिना होणं । तैसे न सांडता ब्रह्मपण । प्रकटे विश्व ॥५५२॥
जसे पाण्यानेच तरंग होणं । तैसे तोच विश्व होऊन । दावी जगाचे प्रकटन । स्वत: ठायी ॥५५३॥
प्रतिबिंबाचे घटणे आणि वाढणे । जसे चंद्राचेच कारणे । तैसे विश्व होणे जाणे । ब्रह्माठायी ॥५५४॥
विश्व राहे वा जाये । ब्रह्म ब्रह्माचेच ठाये । सूर्या दिवसरात्र नोहे । ठाऊक जैसे ॥५५५॥
तयाची ती तुलना । कोणाशीच होईना । ब्रह्मीचा ब्रह्मपणा । ब्रह्माठायी ॥५५६॥
जे आपणच आपणा । जाणतसे अर्जुना । वर्णणे त्या दर्शना । शक्य नाही ॥५५७॥
निरुपाधिक मी अर्जुना । क्षर अक्षराहून जुना । प्राप्त होता आत्मज्ञाना । समज माझी ॥५५८॥
होता अर्जुना आत्मज्ञान । येते पुरुषोत्तमाची जाण । स्वत:च ब्रह्म होऊन । जाणावे मजसी ॥५५९॥
घडता झोपेतून जागरण । जैसे संपती स्वप्न । तैसे विश्व जाते विरून । ज्ञान होता ॥५६०॥
जाणता तो दोर । सर्पाभास होतसे दूर । तैसा संपे अहंकाराचा भार । ज्ञान होता ॥५६१॥
अलंकारात सोने जाणता । अलंकारत्व मग मिथ्यता । तैसे मजसी जाणता । मिथ्याच विश्व ॥५६२॥
स्थिर होता आत्मज्ञानात । समजतो सच्चिदानंदाचा अर्थ । मग अर्जुना ते द्वैत । उरेच ना ॥५६३॥
तयाने सर्व काही जाणलं । हे म्हणणं अर्जुना फोल । द्वैतच नाही उरलं । तयाच्या पाशी ॥५६४॥
म्हणून माझ्या त्या भजना । तोच योग्य अर्जुना । गगन जैसे आलिंगना । गगनाचिया ॥५६५॥
मेजवानी क्षीरसागरा देणे । मग पडे क्षीरसागरचि होणे । अमृतचि होऊन भेटणे । अमृती जेवि ॥५६६॥
शुद्ध सोन्यात मिसळणे । मग शुद्ध होणे लागणे । तैसे मीच होऊन जाणे । भक्ती माझी ॥५६७॥
सागरासी न मिसळता । कैसी गंगा सागराची ऐक्यता । तैसे मीच न होता । भक्ती नाही ॥५६८॥
तरंग जसा सागरात । विरून असे तो जात । तैसे एकरूप होणे ब्रह्मात । भजन अर्जुना ॥५६९॥
जशी सूर्य प्रभेची एकता । तैसे मजसी एकरूप होता । तयाच्याच बा हाता । लागले भजन ॥५७०॥
ऐसे सर्व शास्त्रांचे सार । ज्ञान जे अपार । त्या ज्ञानाचा उच्चार । ऐकलास तू ॥५७१॥
करून शब्दांचे मंथन । कथिले तुजला हे ज्ञान । ते श्री व्यासांच्याच कृपेनं । घडले अर्जुना ॥५७२॥
गंगा ही ज्ञानामृताची । कळा सतरावी आनंदचंद्राची । त्या विचारसागराची । लक्ष्मी जी ॥५७३॥
जे काही तिने बोलणे । आपुल्या जीवप्राणे । न मीवाचून काही जाणे । अन्य काही ॥५७४॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

क्षर अक्षर ते जाणता । तयांचे अस्तित्व लोपता । तेव्हाच ती ब्रह्ममयता । हाता येते ॥५७५॥
म्हणून अर्जुना आता । जगती प्रसिद्ध गीता । ब्रह्मज्ञानाची ती कथा । तिच्याच ठायी ॥५७६॥
जिंकण्या हा संसार । गीताच आहे आधार । जीव होतो भवचक्राच्या पार । आकळता गीता ॥५७७॥
आज तुला जे सांगितले । ते गुप्त धनचि दाविले । आज पुण्य पहा फळले । अर्जुना तुझे ॥५७८॥
शिवाच्या त्या माथी । गंगा जी गुप्त ठेवली होती । केलीस तू प्राप्त ती । गौतमाप्रमाणे ॥५७९॥
अर्जुना तूच ब्रह्म पूर्ण । दावण्या तुझे तुज ब्रह्मपण । आलो पहा आरसा होऊन । तुझ्याच साठी ॥५८०॥
जसा सागर प्रतिबिंब प्रकटवून । घेतो आकाशा सामावून । तसे घेतलेस तू उमजून । ब्रह्मज्ञान ॥५८१॥
त्रिगुणाचा तो धिंगाणा । सांडलास तू अर्जुना । म्हणूनच आत्मज्ञाना । पावलास तू ॥५८२॥
अर्जुना गीतेचे वर्णन । करु कोणत्या शब्दानं । घडे मोहाचं संपणं । आकळता गीता ॥५८३॥
जसे करता अमृत सेवन । मरण जात असे संपून । तैसे प्राप्त होते अमरपण । गीतेकारणे ॥५८४॥
आकळता गीता अंतरात । आत्मज्ञानही होतसे प्राप्त । तेथे मोहाची ती बात । क्षुल्लक अर्जुना ॥५८५॥
आत्मज्ञानाच्या कारण । कर्मच जातसे विरून । स्वत:ची व्यर्थता जाणून । संपते कर्म ॥५८६॥
हरवलेली वस्तू सापडणं । मग थांबते ते शोधणं । तैसे होता आत्मज्ञान । खुंटते कर्म ॥५८७॥
म्हणून ज्ञानियाच्या ठिकाणी । नाहीच कर्माची राहटणी । ऐसे त्या भगवंतानी । सांगितले अर्जुना ॥५८८॥
ऐसे भगवंताचे वचनामृत । प्रकटले अर्जुनाच्या अंतरात । आणि झाले ते प्राप्त । संजयाही ॥५८९॥
आणि त्या संजयानं । सांगितले धृतराष्ट्रा ते ज्ञान । म्हणून अंतकाळी राजाचे मरण । सुलभ झाले ॥५९०॥
अपात्रही असून । जर केले गीतेचे श्रवण । मग करता चिंतन मनन । कल्याण त्याचे ॥५९१॥
दूध घालता द्राक्षवेलीच्या मुळात । वाटते गेले ते फुकट । पण भरपाई होते दुप्पट । फळे येता ॥५९२॥
तैसी भगवंताची वचनं । धृतराष्ट्रा सांगितली संजयानं । म्हणून तयाचे कल्याण । झाले अंती ॥५९३॥
तीच भगवंताची वचनामृत । मी सांगतली मराठीत । जशी दिली बा कुवत । भगवंताने ॥५९४॥
शेवंतीचे रूप पाहता । नाहीच त्यात विशेषता । तेथे भ्रमराची रसिकता । अनिवार्य अर्जुना ॥५९५॥
जे काही असे सत्य प्रमाण । तेच स्वीकारावे आपण । उर्वरित द्यावे सोडून । अज्ञान माझे ॥५९६॥
जसे मूल असूनही अजाण । आई बाप जाती आनंदून । तयाचं बोबडे बोलणं । आवडे तया ॥५९७॥
तैसे या ग्रंथाकारणे । तुम्ही मजसी प्रेम करणे । जरी बोललो अज्ञानपणे । काही बाही ॥५९८॥
आता श्रीगुरूनं । करावी ज्ञानदेवाची सेवा मान्य । हेच बा विनवणं । आहे येथे ॥५९९॥

ॐतत्सदिति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे पुरूषोत्तमयोगोनाम पंचदशोऽध्याय: ॥१५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

---

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पाडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे ह्रदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान®

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०